लोकमत

# बोरिवलीत रंगणार मल्लखांबचा थरार

लोकमत न्यूज नेटवर्क

**मुंबई :** बोरिवलीमध्ये २८ आणि २९ नोव्हेंबरला राज्यस्तरीय शालेय मल्लखांब स्पर्धेचा थरार रंगणार असून, या स्पर्धेत सुमारे १९२ खेळाडूंचे थरारक सादरीकरण पाहण्याची संधी मिळणार आहे.

क्रीडा व युवक सेवा संचालनालय, पुणे यांच्या मान्यतेने जिल्हा क्रीडा परिषद, जिल्हा क्रीडाधिकारी कार्यालय, मुंबई उपनगर आणि मुंबई उपनगर जिल्हा मल्लखांब संघटना यांच्यावतीने बिमानगर एज्युकेशन सोसायटीच्या यजमानपदाखाली ही स्पर्धा एलआयसी कॉलनीतील बिमानगर एज्युकेशन सोसायटी शाळेत पार पडेल. या स्पर्धेत मुंबईसह पुणे, नाशिक, छत्रपती संभाजीनगर, कोल्हापूर, लातूर, अमरावती व नागपूर येथील १९२ खेळाडूंसह १६ मार्गदर्शक, व्यवस्थापक, ३० पंच व अधिकारी आणि २५ स्वयंसेवक, असा एकूण २६३ जणांचा सहभाग असणार आहे.

पहिल्यांदाच मुंबई उपनगरमध्ये राज्यस्तरीय शालेय मल्लखांब स्पर्धेचे आयोजन होत आहे. या स्पर्धेचा थरारक अनुभव घेण्यासाठी मोठ्या संख्येने खेळाडू, पालक, प्रशिक्षक व क्रीडाप्रेमींनी उपस्थित राहावे, असे आवाहन योजकांनी केले आहे.